पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/५०७/२०१२
दिनांक- ३१/०५/२०१२

प्रति,

मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ५.६.२०१२ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ५.६.२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- ९

दिनांक- ५.६.२०१२ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ५/६/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक २९/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.५/२०११/१२ मधील अ.क्र.१ अन्वये, भोसरी उड्डान पुलाखाली उद्यान विकसित करणेकामी मे.क्रिएटीव्ह बिझनेस असोसिएट्स (नि.र.रू. १६,२४,५००/- [र.रू.सोळा लाख चोविस हजार पाचशे] पेक्षा १३.५० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.
(दिनांक ५.६.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G४B/२५/२०११-१२ मधील अ.क्र.४२ अन्वये, प्रभाग क्र.९० पिंपळेनिलख येथील मनपा सार्वजनिक संडास ब्लॉकची स्थापत्य विषयक दुरुस्ती करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,६७,४०५/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार चारशे पाच] पेक्षा २७.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १४,११,९५४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.
(दिनांक ५.६.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) मा.विधी समिती सभा दिनांक ७/५/२०१२ ठराव क्र.७ नुसार, नवीन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ५.६.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ४) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ रोजी ठराव क्र.७ नुसार, पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना आंतरकचेरी कबड्डी, कॅरम (पुरुष),कॅरम (महिला),हॉकी,बुध्दीबळ,लॉन टेनिस,फुटबॉल जलतरण या ८ खेळांच्या स्पर्धा आयोजित करणेकामी आर्थिक पुरस्कार देण्यासाठी पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना एकूण आर्थिक सहाय्य र.रु.१,३२,६००/- (अक्षरी र.रु.एक लाख बत्तीस हजार सहाशे) अदा करणेस व सदरचा खर्च क्रीडा निधीमधील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक ५.६.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ५) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ रोजी ठराव क्र.८ नुसार, पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील विविध क्रीडा प्रकारातील विविध प्रकारचे खेळाडू अतिशय मेहनती व होतकरु असून विविध खेळांमध्ये कौशल्य प्राप्त करीत असतात. शहरातील या गुणी खेळाडूंना परदेशात प्रशिक्षण किंवा स्पर्धेत भाग घेणेसाठी निवड होते. परंतु हे सर्व खेळाडू सर्वसामान्य कुटूंबातील असल्यामुळे व आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे कौशल्य असूनही त्यांना परदेशात जाणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यापासून वंचित राहतात व गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक बाबींमुळे ते मागे पडतात. त्यामुळे सांधिक खेळातील खेळाडूंना प्रत्येकी र.रु.५,०००/- वैयक्तिक खेळासाठी खेळाडूस र.रु.१०,०००/- आर्थिक मदत देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक ५.६.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ६) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.५/५२/२०११/१२ मधील अ.क्र.३१ अन्वये, ड प्रभागात ठिकठिकाणी पाण्याच्या उंच टाक्यांची इनलेट व आऊटलेटचे जुने, गळके व निकामी व्हॉल्व्ह बदलणे व नविन बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविणे व देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स (नि.र.रू. १८,७५,०२८/- [र.रू.अठरा लाख पंच्याहत्तर हजार अठ्ठावीस] पेक्षा १०.४० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ७) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.५/५२/२०११/१२ मधील अ.क्र.५२ अन्वये, अशुध्द जलउपसा जलवाहिनीचे रंगकाम व दुरुस्ती करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स (नि.र.रू. १५,४०,१६०/- [र.रू.पंधरा लाख चाळीस हजार एकशे साठ]

पेक्षा १६.७० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ८) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१०/१९/२०११/१२ मधील अ.क्र.६ अन्वये, जलक्षेत्र क्र.ड/१४ सांगवी परिसरात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स (नि.र.रू.१०,१९,२६६/- [र.रू.दहा लाख एकोणीस हजार दोनशे सहासष्ट] पेक्षा २३.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ९) मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/५०७/२०१२
दिनांक : ३१/०५/२०१२ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.